# महिला महाविद्यालयात ईद मिलन साजरा



बोलताना शाहिदा कादरी, व्यासपीठावर प्राचार्या डॉ.स्वाती चांदे, प्रा.छाया जाधव आदींसह विद्यार्थीनी.



तभा वृत्तसेवा
खामगाव, ५ ऑगस्ट

स्थानिक श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयामध्ये जमाअत-ए-इस्लामी हिंद खामगाव महिला मंडळातर्फे ईन मिलन कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.स्वाती चांदे होत्या. प्रमुख वक्त्या म्हणून शाहिदा कादरी होत्या. या प्रसंगी शाहिदा कादरी यांनी कुराणातील आयातीवर प्रकाश टाकत, लोक हो आम्ही तुम्हाला एक पुरुष व एक स्त्री पासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्र आणि वंश बनविले जेणे करुन तुम्ही एकमेकांना ओळखावे. वास्तविक ईश्वराजवळ तुमच्यापैकी सर्वात जास्त प्रतिष्ठा आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईश पारायण आहे, असे सांगितले.

याप्रसंगी प्राचार्या डॉ.चांदे म्हणाल्या, जगाच्या पाठीवर कुठेही जा. सगळ्या स्त्रियांचे दु:ख समान आहे.

केवळ स्वरुप बदलते. परंतु, आपल्यासारख्या सुशिक्षित स्त्रियांनी कुठल्याही जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या स्त्रियांचे दु:ख सावरण्यासाठी मदतीचा हात देण्याकरिता तयार रहावे, ही अपेक्षा करते.

अध्यक्षीय भाषणानंतर खिरखुरमा प्रसादाचा महाविद्यालयीन विद्यार्थींनीसह सर्वांनी आस्वाद घेतला. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती प्रा. डॉ. सिंग, प्रा.अवंजाळ, प्रा. डॉ. सातव, प्रा.डॉ. देशमुख, प्रा.जाधव, प्रा. थारकर यांची होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.छाया जाधव यांनी केले. ■

# Report

## Year 2016-17

**Subject :- Id- Milan**

On 29th Aug 2016 Jamate-ae-Islami Hind an organization who works for upliftment Muslim Community, approached college authorities to celebrate Id-E-Milad. Women organizers and members of the organization were present. The president of the organization said we are children of Allah and God is within us. We all should live in harmony. President of the foundation Dr. Swati Chande said all over the world women face problems and common height at this time irrespective of caste religion, area women should help each other. The programme ended up with delicious Sheer-Kurma.

Chande

PRINCIPAL
Smt. S. R. Mohata Mahila
Mahavidyalaya, Khamgaon